

# क्षणचित्रे

**प्रभाकर बरवे**

आयुष्याच्या वाटचालीत वेळोवेळी मनावर अचानक उमटलेली ही काही क्षणचित्रे : काही थरथरती...काही धूसर...काही नि:संदिग्ध पण परिणाम मनात खोलवर उरलेला...

आजोबा माझ्या वडिलांना म्हणाले, ''शिवराम, चल कुऱ्हाड घे आणि वाडीत काळंब्याजवळ चल.'' वडील मनात दचकले. हा काळंबा गेली दोन वर्षे अजिबात मोहोर धरत नव्हता. ते झाड तोडण्याचा तर यांचा विचार नसेल ना, अशी शंका त्यांच्या मनात आली. पण काही न बोलता निमूटपणे कुऱ्हाड घेऊन आजोबांबरोबर निघाले. झाड रायवळ आंब्याचे, फळाच्या देठाजवळ काळसर हिरवा गडद रंग, पण चवीला अत्यंत गोड. वर्षानुवर्षे हे झाड कमीअधिक फरकाने असंख्य फळे देत राहिले. पण गेली दोन वर्षे ते अजिबात बाजत नव्हते. वास्तविक सहसा कारणाशिवाय कोणतेही झाड तोडण्याचा विचार त्यांच्या मनाला शिवणेही शक्य नव्हते. कुटुंबात एखादा मृत्यू झाला तरच फाट्यांसाठी झाड नाइलाजाने तोडावे लागत असे. त्यामुळे वडील साशंक झाले होते. झाडाजवळ पोचल्यावर आजोबा वर तोंड करून काळंब्याला म्हणाले, ''तू हे दोन वर्ष काय चालवलं आहेस? ह्या वर्षीही मोहोर धरला नाहीस तर मुळासकट छाटून टाकीन.'' आणि वडिलांना म्हणाले, ''शिवराम, कुऱ्हाड उगार पण त्याला इजा करू नकोस. घाव घालायचा नाही-नुसता त्याला दम द्यायचा आहे.'' वडिलांनी तसे केले. मग आजोबा म्हणाले, ''चल, आता काम झाले आहे.''

त्या वर्षी कर्मधर्मसंयोगाने किंवा आणखी काही अज्ञात कारणामुळे, झाडाच्या एका फांदीला मोहोर धरला. आणि पुढे ते पूर्ववत बाजू लागले.

नव्या नुकत्याच पूर्ण झालेल्या इमारतीच्या बाहेर कंपाऊंड गेटजवळ उभा राहून, सहज जवळून वाहणाऱ्या सांडपाण्याच्या नाल्यामध्ये काही पाहत उभा होतो. पावसाळा असल्यामुळे सांडपाणी तसे स्वच्छच होते. त्यामध्ये आता मात्र चकचकीत ऊन्ह वाहत होते. सांडपाण्याचे रूपांतर एखाद्या स्वच्छ, पारदर्शक निर्झरामध्ये होऊन ते वैभव शांतपणे वाहत होते. पाण्याला मोठा ओघ नसला तरी, त्या वाहण्यातून मंद गुणगुण निश्चितपणे ऐकू येत होती. मनात विचार असा काहीच नव्हता. इतरांची वाट पाहत उभा होतो. मन आपोआप प्रसन्न होत होते. आनंद असा कोठेही भेटू शकतो.

एका अंधारलेल्या लहानशा खोलीत, सतरंज्या अंथरून त्यांवर काही चित्रकारांची सभा चालली होती. सर्वांच्या डोईवर टिळकांची असे तशी पगडी होती—त्या पगड्यांच्या झिरमिळ्या चर्चेबरोबर हलत होत्या. सगळ्यांनी उपरणीही पांघरली होती. एक-दोघेजण तिथे खुर्ची, मोढे अशा काहीशा उच्च आसनांवर बसले होते. एकुलत्या एक खिडकीतून जाड पडद्याआडून काहीसा धूसर असा संधि-प्रकाश आतमध्ये येत होता. चर्चा



ाठ्या तावातावाने होत होती. काहींच्या हातांत शिलगावलेली सिगरेटही ःसत होती. सर्वांच्या मधोमध काही उरलेले खाद्यपदार्थ व चहाचे रिकामे पही दिसत होते. चर्चा बहुतेक 'आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय मकालीनांचे स्थान' अशी काहीतरी होती. इतक्यात एक काळेकुट्ट मांजर र किलकिले करून अंग चोरून आत आले. चर्चा खंडित झाली. आता र्व जण त्या मांजराकडेच पाहू लागले. हा अपशकुन आहे की हे एक लात्मक हॅपनिंग आहे यावरच आता वाद सुरू झाला. त्या काळ्याकुट्ट ांजरानेही जोरातच 'म्याऊऽऽ' असा उद्गार काढून त्या वादावर गक्कामोर्तब केले आणि सभा बरखास्त झाली.

पुढे गावात शिरताना एका ठिकाणी तळमजल्यावर नव्या परंतु अंधाऱ्या मारतीत, एका मोठ्या रिकाम्या दुकानात 'पेणच्या गणेशमूर्ती येथे'...अशा त्वरतेने रंगविलेल्या पाटीजवळ लहान मोठ्या गणेशमूर्तींचे सैन्य तळ ाकून बसले होते. दुसऱ्या समोरच्या रिकाम्या कोपऱ्यात एक खूप मोठा णपती सेनापतीसारखा उभा होता. एरवी कोणताही नक्की रंग नसलेल्या ततीच्या अंधाऱ्या वातावरणात एकदम हे रंगमय चैतन्य—लाल, पिवळे, रवे, निळे डोळे, सोनेरी मुकुट, सर्वत्र सोनेरी झगमगाटात एकवटलेले हे फलातून रंग...मन आनंदाने भरून येत होते. गणेशमूर्तींमधे ही सर्व जादू ाहे. ती जादू कोणत्याही व्याख्येपलीकडे जाते. लहानपणी नागावला ामचा साधा, दीड दिवसाचा गणपतीही आनंदाचा प्रचंड ठेवा घेऊन येत से. बालमनावर हा आनंद, हे संस्कार कायमचे कोरले गेले असावेत. सऱ्या दिवशी संध्याकाळी शेवटची आरती म्हणताना मन अत्यंत अस्वस्थ ाऊ लागे. डोळ्यांत अश्रू तरळू लागत. दीड दिवसाच्या या पाहुण्याचा ारोप घेताना आता केवळ रिकाम्या आरशात समईचे प्रतिबिंब पाहून ामाधान मानायचे.

दूरवरून हायवेवरच्या वाहनांचा येणारा हा आवाज, प्रथम मला समुद्राच्या लाटांचा वाटला. अगदी सुरवातीला खरे सांगायचे म्हणजे मला तो ऐकूच आला नाही; कारण इथली घनदाट शांतता आणि पक्ष्यांची किलबिलच मी ऐकत होतो. दुपारी याच आवाजातून एखाद्या शाळेतील सांघिक प्रार्थना किंवा म्युनसिपल स्कूलमधले गायनमास्तर 'थाट समरिचा...' ह्या चालीत संगीताचे काही प्राथमिक धडे मुलांना देत आहेत असे ऐकू येत असे.

एक म्हातारा कुत्रा दरवाजात बांधलेला. पाठीवरचे अर्धे केस गेलेला. काहीसा काळवंडलेला-थकलेला. प्रेमळ मुद्रा, शांत भाव. भुंकणे वगैरे स्वाभाविक कर्तव्ये कधीच विसरलेला. निव्वळ मरेपर्यंत आता हताशपणे, अगतिकतेने जगणारा. थोडक्यात, एक भाकड प्राणी. अशा प्राण्याचे काय करायचे? त्याला कोठे सोडून देणार? अर्थात त्याचा भूतकाळ स्मरून—त्याचा प्रामाणिकपणा, एक सोबतीचा आधार देणारा सहवास लक्षात घेऊन त्याला आता वर्तमानात पोसणे, मालकाचे कर्तव्यच आहे. ते तो मालक बिनबोभाट पार पाडीत होता. काही दिवसांनी फार तर तो पुढील दारी न दिसता मागील दारी बांधला जाऊ लागेल. परंतु ऋणानुबंध ह्या ना त्या रूपात कायम राहतील.

एक काळा लेखक (आफ्रिकन ओरिजिन) त्याच्या आत्मचरित्रातील काही भाग वाचून दाखवत आहे. काही गोरे, एक चायनीज ओरिजिन असलेला व मी असे सर्व जण ऐकत आहोत. मुख्यत: ड्रगसंबंधीच्या भावनिक ताणाचे ते एक विश्लेषण आहे. अजूनही काळ्या-गोऱ्यांमध्ये तरल भेदभाव आहे. वरकरणी सर्व काही ठीक दिसत असले तरी आतमध्ये वर्णद्वेष धगधगत आहे. वगैरे. गोरे काही बोलले नाहीत. त्यांनी काही विरोधही केला नाही. अमेरिकेत जे 'होमलेस'—निराधार आहेत त्यांपैकी बहुसंख्य अर्थातच काळे किंवा स्पॅनीयर्ड्स आहेत. त्याच्या एकूण वाचनाचा रोख असा, की सत्य हे कटू आहे. ते उच्चारण्याचे धैर्य काळ्यांमध्ये नाही. कारण त्यांना तिथेच

राहायचे आहे. त्यांचा त्रास आणखी वाढेल. कधी कधी अगदी असह्य झाले की हिंसक उद्रेक होतो. तो दडपला जातो. मी शांतपणे ऐकत होतो. भारतातल्या तत्सम परिस्थितीची आठवण झाली. ह्या प्रश्नाचा माझ्या कलेतील प्रश्नांशी थेट संबंध नाही हे खरे.

गावदेवीला माझ्या ऑफिसच्या जवळ एका जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतीत एक अंधेरी खोली मी मित्रांच्या ओळखीने भाड्याने घेतली होती. खोलीत एकच बल्ब होता. सतत दहा वर्षे मी तिथे काम केले. माझ्यापेक्षा भिंतीवरच्या जाळ्यात राहणारे कोळी अधिक काम करीत असत. पिटुकले उंदीर कॅनव्हासमागून पळत असत. कधी एक काळेकुट्ट मांजरही येत असे त्याची माझी मैत्री झाली होती. नाकाने दार ढकलून ते स्टुडिओत येई, काही घेतल्याशिवाय जात नसे. एकूण तेथील वातावरण माझ्या मित्रांना भीतिदायक वाटत असे. तरीही त्यांना ती जागा आवडत असे. मलाही त्या जागेबद्दल विलक्षण आपुलकी वाटत असे. नंतर ऑफिस सोडल्यावर ती जागाही मी सोडली. त्यानंतर पंधरा-वीस वर्षांनी कोणाला तरी त्या जागेचे फोटोग्राफ घेण्याची कल्पना सुचली. मालकाची परवानगी घेऊन, धडधडत्या अंत:करणाने मी व तो फोटोग्राफर तेथे गेलो व तो दरवाजा उघडला. वीस वर्षांनी माझा एके काळचा तो स्टुडिओ डोळे भरून पाहायचा होता. अनेक रम्य आठवणी त्याच्याशी निगडित होत्या. आम्ही दरवाजा अर्धवट उघडला आणि एक धक्काच बसला. जुनी कमोड्स, मोडलेले पंखे, असंख्य पाईप्स, तुळया, उलट्या खुर्च्या, खिडक्यांच्या चौकटी असे एकमेकांत गुंतलेले असंख्य आकार. खोलीत पाय ठेवण्यास जागा नव्हती. मन गलबलले. मात्र एका भिंतीवर मी उमटवलेला लाल रंगातला माझ्या हाताचा ठसा—जसाच्या तसा—कायम होता. दरवाजा बंद केला आणि किल्ली मालकाला परत दिली.

खानदेशात, एका अगदी लहानशा खेड्यात एका हातमागाच्या सहकारी संस्थेत ऑफिसकामानिमित्त गेलो होतो. बसने त्या गावाला पोचण्यास सकाळचे अकरा वाजले. म्हणजे काहीसा उशीरच झाला होता. कशीबशी ती सहकारी संस्था शोधून काढली. नेहमीप्रमाणे कोणी सहकारी बरोबर नव्हते. त्यामुळे एकटाच होतो. एका लहानशा घरातील एका अंधाऱ्या खोलीत फक्त एक वृद्ध कारकून जमिनीवरच्या बैठकीवर, संस्थेचे हिशोब लिहिण्यात गर्क होता. वरून काचेरी कौलातून येत असलेल्या प्रकाशात त्याचे काम चालले होते. समोरच्या सतरंजीवर मला त्याने बसायला सांगितले व थोडीशी विचारपूस केली. पाण्याचा तांब्या, भांडे पुढे ठेवले संस्थेमधील चिटणीस वगैरे कोणीही पदाधिकारी तिथे हजर नव्हते. त्यांच्या येण्याची शक्यताही दिसत नव्हती. खोलीत इतरत्र सर्वत्र हातमागाचे कापड, साड्या वगैरेचे गठ्ठे रचून ठेवलेले दिसत होते. हातमाग कापडाचा वास खोलीतील अंधारात भरून राहिला होता. अत्यंत निर्विकार मुद्रेने मी विचारलेल्या प्रश्नांची आवश्यक ती उत्तरे तो तितक्याच रुक्षतेने देत होता. मी ऑफिसने दिलेला फॉर्म भरत होतो. एकीकडे पोटात भुकेची जाणीव वाढत होती. चहा वगैरे मिळेल अशी आशा करण्यास जागा नव्हती. काम संपल्यावर निरोप घेताना इथे एखादे चहा वगैरे मिळण्याचे दुकान गावात आहे का अशी चौकशी केली. त्याने नकारार्थी मान हलवली. घड्याळात दीड वाजला होता. माझा उतरलेला चेहरा पाहून, माझी दया येऊन, ''बस-थांब्यावरच्या सायकल दुकानात चौकशी करा. कदाचित तो चहाची व्यवस्था करील.'' अशी माहिती त्याने पुरवली. त्या वृद्धाचे आभार मानून मी ते सायकल-दुरुस्तीचे दुकान गाठले. काहीशा संकोचाने पुन्हा चहा किंवा काही खावयास मिळेल का याची चौकशी केली. ''थांबा, कारभारणीला विचारून सांगतो'' असे दुकानदार म्हणाला. नंतर बाहेर येऊन, ''चहाला दूध नाही, पण दोन भाकऱ्या करून देऊ. तोपर्यंत थांबावं'' लागेल असे म्हणाला.





माझ्या जिवात जीव आला. रिकाम्या सडकेवर येरझारा घालून वेळ काढीत होतो. मनात भाकरीखेरीज अन्य विचार नव्हता.

आजी वारली तेव्हा मी नोकरीनिमित्त बनारसला होतो. माझ्या वडिलांनी तिच्या अस्थी एका हिंगाच्या डबीत घालून पोष्टाने माझ्याकडे बनारसला पाठवल्या. तिची इच्छा गंगेत तिची हाडे पडावी अशी होती. अस्थींची डबी मला मिळाल्यावर मी कुतूहलापोटी आदल्या रात्री उघडून पाहिली. कोठेतरी अस्वस्थ झालो. त्या अस्थींमध्ये जणू काही आजीच मला दिसली आणि शिवाय त्या डबीला—म्हणजे अस्थींना-अजूनही हिंगाचा वास येतो आहे असा मला भास झाला. पटकन पुन्हा डबी बंद करून मी माझ्या बॅगेत ठेवली. दुसऱ्या दिवशी अगदी सकाळी मी माझ्या मित्राला म्हणालो, ''चल, गंगेवर जायचं आहे.'' त्याप्रमाणे आम्ही दोघे गंगेवर पोचलो. एक होडी



पैलतीरी जाऊन येण्यासाठी ठरवली. प्रवाहाच्या मध्यावर आल्यावर ती डबी मी हळूच पाण्यात सोडली. सहज पाहिले तर ती डबी पाण्यावर तरंगत होती. हळूच हात लांब करून, नावेतूनच ती डबी मी पुन्हा हस्तगत केली. व हळूच ती उघडून गंगेत उपडी केली. हळूच नमस्कारही केला. नावाडी हे सर्व पाहत होता. ''आप अस्थी डाल रहे हैं, संस्कार करने पडेंगे नही तो पाप लगेगा.'' त्याने मला दटावले. मी त्याला म्हणालो, ''पाप-पुण्यकी आप फिकिर मत करो, मैं सब देख लूंगा. अभी वापस चलो और आगे नही जाना है.'' त्याने बरेच आकांडतांडव केले. किनाऱ्यावर परत आल्यावर तेथील पंडितांना बोलावून आरडाओरडा करू लागला. मी म्हणालो ''चूप बैठो. और एक रुपिया दूंगा. हम बनारस के ही है. सब जानते है.'' आणि जड पावलांनी घरी परतलो.

इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा आपल्याला येते म्हणजे जगात कोठेही सहज वावरता येईल असा इथे भारतात माझा समज झाला होता. परंतु युरोपमधल्या इस्तंबूल शहरात भाषेच्या अडचणीमुळे माझा कोंडमारा झाला होता. त्यात तीन दिवसांची सलग सुटी आली त्यामुळे कामही काही उरले नाही. एकटेपणाचा कडेलोट झाला. परिस्थितीने लादलेल्या मौनामुळे वेड लागण्याची पाळी आली. हॉटेलमधून निघून फक्त एकाच मोठ्या रस्त्यावर नुसत्या शोरूम्स पाहत फिरणे हा एकमेव उपाय उरला होता. पुन्हा हॉटेल-रूमवर परत येताना अंगावर शहारे येत असत. मित्रांना पत्रे वगैरे लिहून झाली होती. भिंतीवर माझे विचार, स्वगते आदळून पुन्हा बूमरँगसारखी परत येत होती. म्हणून पुन्हा मोठ्या रस्त्यावर आलो व सिनेमागृहासारखा दिसणाऱ्या एका इमारतीत मनाचा हिय्या करून आत घुसलो. तिकीट-खिडकीत एक भडक मेकअप केलेल्या स्त्रीकडून एक तिकीट घेतले. आतमध्ये सिनेमा सुरूच होता. दर दहा मिनिटांनी फिल्म संपत असे व अर्ध्या तासाचे इंटरमिशन. फिल्म ब्ल्यू होती. गोष्टीची जरूर नव्हती. काही करून संभोगदृश्याशी संबंध येत होता. एकदोन तत्सम फिल्म पाहिल्यावर आणि इंटरमिशनला प्रकाशात आजूबाजूचे प्रेक्षक पाहिल्यावर, छातीत धस्स झाले. फिल्मचाही कंटाळा आला. तसाच बाहेर आलो आणि मोकळ्या रस्त्यावरच्या पी० टी० टी० अशा आद्याक्षरांच्या पोष्टात जाऊन पत्रे पोष्टात टाकली. ❖







**सुलभ व आकर्षक कर्ज योजना**
**आपल्या दिवाळीचा आनंद द्विगुणीत करतील.**

आपल्या बजेटमध्ये न बसणाऱ्या ह्या वस्तू आमच्या सुलभ आणि आकर्षक कर्जयोजनेद्वारे आपणास खरेदी करता येतील. सविस्तर माहितीसाठी आमच्या कोणत्याही शाखाधिकाऱ्याशी संपर्क साधा.

**दीपावली शुभचिंतन**

**सारस्वत बँक**
दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना: १९१८
घराघरात समृध्दी वाढवणारी.